आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
५ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या ५ वर्षात सर्वांचं वीज बिल कमी करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

- येत्या पाच वर्षात म्हाडाच्या माध्यमातून आठ लाख घरं उभारण्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आश्वासन

- राज्य सरकार यावर्षी बाल, युवा आणि महिला साहित्य संमेलन आयोजित करणार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची घोषणा

**आणि**

- सोयाबीन खरेदी केंद्र वाढवण्याची आणि सर्व खरेदी होईपर्यंत केंद्र सुरू ठेवण्याची विरोधकांची मागणी

**<><><><><>**

येत्या पाच वर्षात वीज बिल कमी करुन सर्व ग्राहकांना दिलासा देण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. बीड जिल्ह्यातल्या आष्टी तालुक्यातल्या शिंपोर खुंटेफळ साठवण तलावाचं भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. ऊर्जा विभागाने पुढच्या पाच वर्षाचे आपले वीजेचे दर काय असतील, याची पिटीशन दाखल केली. त्यामुळे हे दर कमी होणार घरगुती आणि औद्योगिक वीजेचे दर कमी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री सौर कृषी वीज योजनेचं काम मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होईल, आणि राज्यभरातल्या सर्व शेतकऱ्यांना लागणारा १६ हजार मेगावॅट वीज पुरवठा दिवसा केला जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

नदीजोड प्रकल्पाचं काम येत्या वर्षभरामधे सुरू करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठवाड्यातला दुष्काळ इतिहासजमा करता येईल, त्यासाठीचा आराखडा तयार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. पश्चिमी वाहिन्यांचं समुद्रात वाहून जाणारं पाणी जोर्यंत गोदावरीच्या खोऱ्यात आणलं जाणार नाही तोपर्यंत मराठवाडा दुष्काळमुक्त होऊ शकत नाही, हे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणलं जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री - (२७ सेकंद)**

महायुती सरकारच्या काळात जलयुक्त शिवारच्या माध्यमातून सिंचनाचं काम केलं. त्यामुळे मराठवाड्यातली भूजल पातळी वाढली, असं मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते खो खो विश्वचषक स्पर्धेतल्या विजेत्या संघातले खेळाडू प्रतिक वाईकर, प्रियांका इंगळे, राम कश्यप, सुयश गरगटे, अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड आणि प्रशिक्षक प्राची वाईकर, शिरीन गोडबोले यांचा सत्कार झाला.

**<><><><><>**

पुढच्या पाच वर्षात म्हाडाच्या माध्यमातून आठ लाख घरं उभारली जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते आज ठाण्यात कोकण विभागातली म्हाडाची लॉटरी काढताना बोलत होते. लोकांचा विश्वास म्हाडावर आहे, त्यामुळे लॉटरी निघाल्यावर घरांचा ताबा लवकर द्या, चांगल्या दर्जाचं घर द्या, घरांची गुणवत्ता आम्ही तपासू, असंही त्यांनी सांगितलं.

म्हाडानं गेल्या दीड वर्षात ३ लॉटरी काढल्या असून यापुढंही म्हाडाच्या माध्यमातून अशाच पद्धतीनं लॉटरी काढली जाणार आहे. दरवर्षी म्हाडाच्या माध्यमातून ३० हजार घरांची लॉटरी काढली जाणार असल्याचं म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी, यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

कृषीप्रधान संस्कृती आणि सर्वाधिक लोकसंख्यांक लोकशाही जपण्याची सामूहिक जबाबदारी सर्वच क्षेत्रांची असली तरी सर्वाधिक टक्का असणाऱ्या कृषी क्षेत्रावर आणि पर्यायानं कृषी पदवीधरांवर ती जास्त आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते अकोला इथं डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३९ व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. संपूर्ण विश्वाचं उदरभरण करण्याची क्षमता भारतीय कृषिक्षेत्रात आहे, असं ते म्हणाले. शाश्वत ग्रामविकासासाठी कृषी विद्यापीठांनी मध्यवर्ती भूमिका बजावावी, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

मातीचा पोत सुधारण्याकडे लक्ष द्यावं लागेल. चांगलं बी-बियाणं, वाण शोधावे लागतील, पाण्याचा काटकसरीनं वापर, तसंच जलपुनर्भरणाच्या क्षेत्रात काम करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

कला हा इतर प्रत्येक विषयाला समृद्ध करणारा विषय असून कला विषयामुळे जाणिवा विस्तारतात. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी अथवा इतर व्यावसायिक शिक्षणाला कलेची जोड दिली गेली पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं. राज्य शासनाच्या कला संचालनालयातर्फे आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचं उद्घाटन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत काल जहांगीर कलादालन इथे संपन्न झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ अमूर्त चित्रकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना राज्यपालांच्या हस्ते वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये, शाल, श्रीफळ आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. शकुंतला कुलकर्णी यांना ज्येष्ठ कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

प्रदर्शनासाठी राज्यभरातल्या  कलाकारांकडून ७७५ कलाकृती प्राप्त झाल्या होत्या; त्यापैकी १४८ कलाकारांच्या १८० कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली.

**<><><><><>**

शालेय जीवनातच मुलांना राष्ट्रपुरुष समजण्यासाठी बाल, युवा आणि महिला साहित्य संमेलन यावर्षी राज्य शासनामार्फत घेण्यात येणार असल्याची माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात आयोजित मुंबई ग्रंथोत्सवाचं उद्घाटन आज झालं, यावेळी ते बोलत होते. मोबाईलबरोबर पुस्तक ऐकण्याची सुविधा आहे त्याचाही विद्यार्थ्यांनी स्वीकार करावा. मराठी संस्कृती जोपासण्यासाठी पुस्तके वाचून आत्मचिंतन करा असं आवाहन त्यांनी केलं. ग्रंथालय डिजिटल करण्यावर भर देण्यात येत असून यासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असं सामंत यांनी सांगितलं. रत्नागिरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय ग्रंथालय आणि रिसर्च सेंटर उभारणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी आपली वाचनकक्षा रुंदावावी, असं आवाहन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याठिकाणी केलं आहे.

**<><><><><>**

सर्व खरेदी होईपर्यंत सोयाबीन खरेदी केंद्र सुरू ठेवावीत, खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. सोयाबीनला ६ हजार प्रति क्विंटल हमीभाव देण्याचं आश्वासन महायुतीनं दिलं होतं, मात्र ते पाळलं नाही, आतापर्यंत खरेदी केलेल्या सोयाबीनचे पैसेही शेतकऱ्यांना मिळाले नाहीत, अशी टीका पटोले यांनी केली.

परभणी इथल्या नाफेडच्या सोयाबीन खरेदीला २० ते २५ दिवस मुदतवाढ द्यावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिलं.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या इचलकरंजीमध्ये महाप्रसादामधून ३०० जणांना विषबाधा झाली आहे. इचलकरंजीतल्या शिवनाकवाडी गावातल्या यात्रेतला प्रसाद खाल्ल्यानंतर अनेकांना त्रास झाला. या सर्वांवर जिल्ह्यातल्या विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू असून अनेक रुग्णांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे.

**<><><><><>**

नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून मनी लॉँड्रिंग केल्याच्या आरोपाखाली १९ ब्रोकिंग संस्था आणि त्यांच्या संचालकांविरुद्ध ईडीनं खटला दाखल केला आहे. विशेष मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत हा खटला दाखल करण्यात आला आहे. गुंतवणूकदारांना मोठ्या परताव्याचं आश्वासन देऊन त्यांची फसवणूक केल्याचा तसंच बेकायदेशीररित्या मिळालेली दलालीची रक्कम व्यवसायात गुंतवल्याचा आरोप ईडीनं केला आहे. याप्रकरणी ईडीनं ३४ कोटी ७४ लाख रुपयांची दलालीची रक्कम तसंच, ३ हजार २८८ कोटी ७६ लाखांची मालमत्ता जप्त केली आहे.

**<><><><><>**

'वेव्ह्ज' उपक्रमाअंतर्गत माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं 'मास्टर द आर्ट ऑफ स्टोरीटेलिंग अँड इन्फ्लुएन्स द फ्यूचर' या कार्यशाळेचं आयोजन केलं होतं. लेखक-दिग्दर्शक सरस्वती बुय्याला यांनी मुंबईतल्या NFDC मध्ये या कार्यशाळेत उपस्थितांना मार्गदर्शन केलं. तसंच ॲनिमेशन क्षेत्राच्या भारतातल्या परिस्थितीवरही कार्यशाळेत ऊहापोह झाला.

दरम्यान, 'वेव्ह्ज'अंतर्गत आयोजित केलेल्या रील तयार करण्याच्या स्पर्धेला देशभरातून आणि इतर २० देशांमधून उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकंदर ३ हजार ३७९ जणांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

<><><><><>

नंदुरबारच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल असलेल्या एका ११ वर्षीय मुलीला जीबीएस, अर्थात गुलेन बॅरी सिंड्रोमची लागण झाल्याचं स्पष्ट झालं आहे. अक्कलकुवा तालुक्यातली हा मुलगी 25 जानेवारीपासून उपचारासाठी दाखल असून तिच्यात जीबीएसची लक्षणं दिसून येत होती. सध्या ती व्हॅटीलेटरवर असून तिची प्रकृती स्थिर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानुसार गडचिरोली हा   मलेरियामुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्या, देशातल्या ६ जिल्ह्यांपैकी एक आहे. या जिल्ह्याला मलेरियामुक्त करण्यासाठी डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील कृतीदलानं सादर केलेल्या जिल्हा मलेरियामुक्त करण्याच्या आराखड्याची येत्या १ एप्रिलपासून अंमलबजावणी सुरू होणार आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी तर कोकणात काही ठिकाणी किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं १३ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र  हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//